**समक्ष अध्यक्ष, मोटार अपघात प्रकरणे न्यायाधिकरण, वर्धा**
**एम.ए.सी.पी (एम.ए.एन.आर.जे.आय.) क्र. ६९/२०२६**
**आस्था नितेश पाटिल –वि.– निरंक**

**आदेश नि. क्र. १ वर पारित**
**दिनांक २४/०७/२०२६**

मोटार अपघात दावा प्रकरण क्र. १३६/२००७ दिनांक ०४/०२/२००९ रोजी निकाली काढण्यात आले. सदर प्रकरणातील न्यायनिर्णयानुसार गैरअर्जदार यांनी रक्कम रुपये **४,४१,३५६/– (अक्षरी रुपये चार लाख एकेचाळीस हजार तिनशे छप्पन फक्त)** न्यायालयात जमा केली होती. सदर मुळ प्रकरणातील आदेशानुसार अर्जदार क्र. २ आस्था नितेश पाटिल यांना ४० टक्के रक्कम द्यायची होती. दिनांक १७.०८.२०१० चे आदेशानुसार अर्जदार क्र. २ आस्था नितेश पाटिल यांचे हिश्श्याची ४० टक्के रक्कम रुपये **१,७६,५४२/– (अक्षरी रुपये एक लाख छाहत्तर हजार पाचशे बेचाळीस फक्त)** ती सज्ञान होईपावेतो मुदतठेवी मधे ठेवण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. ती रक्कम मिळण्याकरीता मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ आस्था नितेश पाटिल यांनी सदर अर्ज केलेला आहे.

अर्जदाराने अर्जामधे दाखल केलेल्या तिच्या आधारकार्ड व जन्म प्रमाणपत्र नुसार तिची जन्मतारीख २२/०९/२००७ आहे यावरुन ती आज रोजी १८ वर्षाची झाल्याचे दिसुन येते.

उपरोक्त मोटार अपघात प्रकरण १३६/२००७ मधे अर्जदार क्र. २ आस्था नितेश पाटिल यांचे नावे रक्कम रुपये **१,७६,५४२/– (अक्षरी रुपये एक लाख छाहत्तर हजार पाचशे बेचाळीस फक्त)** ही एफ.डी.आर. खाता क्र. ०६३४२०१०००२३४८८ दिनांक १२.११.२०१० नुसार आंध्रा बॅंक शाखा वर्धा येथे जमा असुन तिची मुदत दिनांक १२/११/२०२० रोजी संपली असल्याबाबतचा अहवाल नि. क्र. ५ अन्वये वरिष्ठ लिपीक (मोटार अपघात), रोख व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, वर्धा यांनी दिलेला आहे.

प्रकरणांतील निकालाचे आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील अथवा स्थगणादेश नसल्याबाबतचा अहवाल संबंधित लिपीक यांनी दिलेला आहे. मुळ अभिलेखाची पडताळणी केली असता अर्जदाराने प्रकरणांत आवश्यक असलेली संपूर्ण कोर्ट फी भरलेली आहे. वरील मुदत ठेव पावतीची परिपक्वता झालेली आहे. त्यामुळे सदर अर्जदारास मुदतठेवीची रक्कम देणे योग्य होईल.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**<u>आदेश</u>**

मुळ प्रकरणातील अर्जदार क्र. २ आस्था नितेश पाटिल यांना एफ.डी.आर. खाता क्र. ०६३४२०१०००२३४८८ मध्ये जमा असलेली रक्कम रुपये **१,७६,५४२/- (अक्षरी रुपये एक लाख छाहत्तर हजार पाचशे बेचाळीस फक्त)** एवढी व्याजासह तिचे पडताळणीअंती प्रदान करण्यांत यावी. याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.07.24 18:10:49 +0530

दिनांक: २४/०७/२०२६

(हेमंत भ. गायकवाड)
अध्यक्ष,
मोटार अपघात प्रकरण न्यायाधिकरण,वर्धा